# मराठी

**( अनिवार्य )**

वेळ : तीन तास

कमाल अंक : 300

## प्रश्नपत्रिकेशी संबंधित सूचना

**प्रश्न सोडविण्यापूर्वी पुढीलपैकी प्रत्येक सूचना काळजीपूर्वक वाचा**

सर्व प्रश्न सोडवायचे आहेत.

प्रश्नाचे गुण त्या त्या प्रश्नासमोर दिलेले आहेत.

प्रश्नामध्ये वेगळा निर्देश केलेला नसेल तर प्रश्नांची उत्तरे मराठीत (देवनागरी लिपीमध्ये) लिहावयाची आहेत.

जेथे जेथे शब्दसंख्येची मर्यादा प्रश्नामध्ये सांगितलेली असेल, तेथे तिचे पालन केलेच पाहिजे. सांगितलेल्या शब्दसंख्येपेक्षा खूप जास्त अथवा खूप कमी शब्दांत उत्तर लिहिलेले असल्यास गुण कमी केले जाऊ शकतात.

प्रश्न-उत्तर पुस्तिकेतील कोणतेही पृष्ठ कोरे सोडल्यास त्यावर स्पष्टपणे काट मारावी.

# MARATHI

**( Compulsory )**

Time Allowed : Three Hours

Maximum Marks : 300

## QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

**Please read each of the following instructions carefully before attempting questions**

All questions are to be attempted.

The number of marks carried by a question is indicated against it.

Answers must be written in MARATHI unless otherwise directed in the question.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to and if answered in much longer or shorter than the prescribed length, marks may be deducted.

Any page or portion of the page left blank in the answer-book must be clearly struck off.



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**1.** खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर *600* शब्दांत निबंध लिहा : 100

*(a)* तंत्रज्ञानाच्या अतिवापराचे दुष्परिणाम

*(b)* धर्मनिरपेक्षता हा लोकशाहीचा मुख्य आधार आहे

*(c)* नोटाबंदीच्या निर्णयामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला होणारे दूरगामी फायदे

*(d)* पाश्चात्य देशांमध्ये आयुर्वेदाबद्दल वाढते आकर्षण

**2.** खालील उतारा काळजीपूर्वक वाचा आणि उताऱ्याच्या शेवटी दिलेल्या प्रश्नांची उत्तरे, सुस्पष्ट, योग्य व संक्षिप्त भाषेत लिहा : 12×5=60

पुस्तके मेंदूसाठी उत्तम आहार आहेत. एका विचारवंताने म्हटले आहे की, मानवसमूहाने आत्तापर्यंत केलेला विचार, कृती आणि शोध पुस्तकांमधून जतन करुन ठेवले आहेत. मानवी सभ्यता आणि संस्कृतीच्या प्रगतीचे श्रेय पुस्तकांना जाते. त्यामुळेच पुस्तकांचे महत्त्व अतुलनीय आहे.

पुस्तकाने आपले अंतःकरण उजळून निघते. उत्तम पुस्तके माणसाला असंस्कृतपणाकडून सुसंस्कृतपणाकडे नेतात, त्याच्यातील सात्त्विक भाव जागृत करुन त्याला पथभ्रष्ट होण्यापासून परावृत्त करतात आणि समाज व राष्ट्राचे मार्गदर्शन करतात. पुस्तके ही प्रेरणादायी असतात आणि त्यांचा आपल्या मन व बुद्धिवर दीर्घकालीन प्रभाव असतो.

www.mpscmaterial.com

मनोरंजनाचे साधन म्हणूनही पुस्तकांकडे पाहिले जाते. इथे मनोरंजन या शब्दाचा अर्थ निव्वळ करमणूक नसून, तो अधिक गहन आहे. जी पुस्तके माणसाच्या अंतर्मनाला स्पर्श करतात, त्याच्या हृदयाला भिडतात तीच खऱ्या अर्थाने मनोरंजनप्रधान पुस्तके आहेत. अशी लक्षवेधी पुस्तके वाचकाला सुखावत असतात. यादृष्टीने हलके-फुलके साहित्यदेखील कमी महत्त्वाचे नसते. असे साहित्य मोठ्याप्रमाणात माणसांचा ताण कमी करतात. आणि त्यांना नैराश्यातून बाहेर काढतात.

उत्तम पुस्तके माणसाच्या ज्ञानवर्धनाचे आणि आनंदाचे साधन आहे विज्ञान, वाणिज्य, कला आणि न्यायशास्त्रावरील पुस्तकांनी माणसाच्या ज्ञानात मोलाची भर घातली आहे. पुस्तकांच्या वाचनातून माणसाला एकप्रकारचे आत्मबल प्राप्त होते. पुस्तके खऱ्या अर्थाने आपले मार्गदर्शन करतात. पुस्तके ज्ञानवर्धन करतात, नवनवीन रहस्ये उलगडून दाखवितात आणि चिंतन-मनन करण्यासही प्रवृत्त करतात. पुस्तके आपल्याला द्विधामनस्थितीतून बाहेर काढतात व सक्षम बनवितात.

गांधीजींनी गीते'ला आई म्हटले आहे. कारण प्रत्येक अडचणीच्या वेळी त्यांना गीतेतून मार्गदर्शन लाभले होते. पुस्तक हे एखाद्या शिक्षकाप्रमाणे कधी रागावत नसते, शिक्षा करीत नसते किंवा मोबदल्यात काहीही मागत नसते. उलट अक्षरत्त्वाचे सत्त्व बहाल करते.

पुस्तके माणसाला सुख देतात. पुस्तकात रमणारा माणूस सहसा नैराश्यात सापडत नाही किंवा रितेपणा अनुभवत नाही.

वैचारिक संघर्षात पुस्तके उत्तम आयुध ठरतात. पुस्तकातील विचारांमध्ये संपूर्ण समाजाला बदलण्याचे सामर्थ्य असते. सध्याचे जग हे विचारांचे जग आहे. समाजात होणारे बदल किंवा क्रांती यांची सुरुवात विचारधारेतूनच होत असते. उत्तम



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

पुस्तके वैयक्तिक आत्मभान तर निर्माण करतातच शिवाय व्यापक प्रबोधनाचे कार्यही करतात. पुस्तकांच्या वाचनातून माणसाचा दृष्टिकोन व्यापक होतो आणि त्याची नैतिक गुणवत्ताही वाढते.

पुस्तके ही चिरंतन संपत्ती असून एका पिढीचे अनुभव दुसऱ्या पिढीपर्यंत उत्तमरित्या पोचवितात. पुस्तकात निहित असलेले ज्ञान हे शाश्वत असते. थोडक्यात सांगायचे तर पुस्तकांचे महत्त्व अपरिमित असते.

*(a)* पुस्तकांचे महत्त्व अतुलनीय का मानले जाते? 12

*(b)* 'मनोरंजन' या शब्दाचा लेखकाला कोणता अर्थ अभिप्रेत आहे? 12

*(c)* पुस्तकांना मार्गदर्शक का म्हटले जाते? 12

*(d)* गांधीजी गीतेला आई का म्हणत असत? 12

*(e)* उत्तम पुस्तके व्यापक प्रबोधनाचे कार्य कसे करतात? 12

**3.** खालील उताऱ्याचा अंदाजे एक तृतीयांश शब्दांत सारांश लिहा. उताऱ्याला शीर्षक देऊ नये. सारांश मराठीत लिहा : 60

परिश्रम हे यशाचे जगातील सर्वोत्तम साधन आहे. आपल्या सर्व महत्त्वाकांक्षांची पूर्तता परिश्रमातूनच करता येते. जग हे कर्मक्षेत्र आहे, त्यामुळे कर्म करणे हाच आपला घर्म आहे. कोणत्याही कामात परिश्रम केल्यानेच यश प्राप्त होते.

परिश्रमामुळेच जीवनाला गतिमानता प्राप्त होते. जर आपण कामाची हेळसांड केली तर जीवनाचा वेग मंदावेल. आळशीपणामुळे आपण अशा आवर्तात सापडतो की त्यातून सुटका होणे कठीण होऊन जाते उलट परिश्रमी माणूस सर्व अडचणींवर मात करतो आणि चौफेर यश प्राप्त करतो. परिश्रम करणारा प्रारब्धाचा विचार न करता सतत कसून काम करीत असतो. एखाद्या प्रसंगी त्याला परिश्रम करुनही यश प्राप्त झाले नाही तरी तो निराश न होता अपयशाच्या कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न करतो आणि आपल्यातील उणिवांवर मात करून यश संपादन करण्याचा प्रयत्न करतो.

या जगात आपल्याला प्रत्येक टप्प्यावर संघर्ष करावा लागतो. आणि त्यातूनच मार्ग काढावा लागतो. आपण कितीही सक्षम व साधन-संपन्न असलो तरी कठोर परिश्रम केल्याशिवाय आपणांस यश प्राप्त होऊ शकणार नाही. जगातील सर्व महापुरुषांच्या यशाच्या मुळाशी त्यांनी केलेले श्रम आणि क्षमता हेच आहे.

आपल्या समाजात अनेक माणसे दैववादी किंवा भाग्यवादी आहेत. अशी माणसे समाजोन्नतीत बाधा ठरतात. दैववादी माणसाने जगात कोणतेही महान कार्य केल्याचे आढळत नाही. शोध, नाविन्यपूर्ण शोध आणि नवनिर्माण हे फक्त परिश्रमाची फलश्रुती आहे. आपल्याकडील संसाधने आणि प्रतिभा ही आपल्याला मार्गस्थ करणारी उत्प्रेरक आहेत. पण कठोर परिश्रम आपणास यश साध्य करण्यास मदत करते.

परिश्रमातूनच यश नि वैभव प्राप्त करता येते. आपण जेव्हा परिश्रमपूर्वक कर्तव्यपूर्ती करतो तेव्हा आपणास अतीव समाधान प्राप्त होते. अंतर्मनातील मलीनता नाहीशी होऊन अत्यंत समाधान लाभते. परिश्रम करणाऱ्या व्यक्तीला कोणतेही कर्मकांड



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

महत्त्वाचे नसते. कर्तव्यपथावर वाटचाल करणे हेच त्याचे ध्येय असते. एखादा शेतकरी दिवसभराच्या परिश्रमानंतर संध्याकाळी जेव्हां आपल्या झोपडीत एखादे लोकगीत गातो तेव्हां त्याच्या स्वरलहरीतून जणू अलौकिक संगीत पाझरते.

शारीरिक श्रम केल्याने समाधान तर लाभतेच शिवाय शरीरही निरोगी राहते. शारीरिक श्रम न केल्यामुळेच आजकाल माणसे अनेक प्रकारच्या व्याधींनी ग्रस्त आहेत. शारीरिक श्रम प्रत्येकासाठी आवश्यकच आहे. शारीरिक श्रम करणारी माणसे दीर्घायुष्यी असतात हे वेगळे सांगण्याची गरज नाही. असेही म्हटले जाते की निरोगी शरीरातच निरोगी मन राहते. निरोगी माणसाला गंभीर गोष्टींचेही सहज आकलन होते. कितीही प्रतिकूल परिस्थिती असली तरी तो न घाबरता त्याला सामोरे जातो आणि सर्व अडचणींवर मात करतो.

मानसिक श्रमाचे महत्त्व कळल्यामुळेच आपले ऋषी-मुनी ध्यानस्थ राहत असत नि जगाच्या कल्याणाचा विचार करीत असत.

परिश्रम या शब्दाला एक वेगळी अर्थच्छटाही आहे. यादृष्टीने श्रम हे उत्पादकही आहे नि अनुत्पादकही आहे. शेतकरी शेतात परिश्रम करतो ते उत्पादक श्रम परंतु मैदानी खेळात केलेले श्रम किंवा व्यायाम याला अनुत्पादक श्रम म्हणता येईल. असे असले तरी अशा श्रमाचेही महत्त्व आहेच. गांधीजींनी म्हटले आहे की जर श्रमच करायचे आहे तर उत्पादक श्रम का करु नये? म्हणजेच गांधीजी प्रत्येक प्रकारच्या श्रमातून आनंद अनुभवीत असे.

ज्या राष्ट्रांची प्रजा परिश्रमी असते तीच राष्ट्रे उन्नती करतात. महायुध्दांचे भीषण परिणाम भोगावे लागल्यानंतरही जपान आणि जर्मनी या देशांनी आपल्या देशाची ज्या प्रकारे उभारणी केली ते कठोर परिश्रमामुळेच शक्य झाले.

शेवटी असे म्हणता येते की कठोर परिश्रम हे आयुष्यातील समाधानाचा आणि नवनवोन्मेषाचा मूलमंत्र आहे.

www.mpscmaterial.com

(एकूण शब्द *452*)

**4.** खालील उताऱ्याचे इंग्रजीत भाषांतर करा : 20

सुप्रसिद्ध स्वातंत्र्यसैनिक राजर्षी पुरुषोत्तमदास टंडन यांनी इ.स. 1919 साली अलाहाबाद नगर पालिकेचे अध्यक्ष म्हणून पदभार ग्रहण केला. ईहेयांच्यासाठी एक मोठे आव्हानच होते. ते अध्यक्ष जरी होते तरी इंग्रजांची ताकद व इतका दबदबा होता की त्यांच्यासोबत काम करणे सामान्य भारतीय माणसांसाठी अवघडच होते. पदभार ग्रहण केल्यावर त्यांच्या लक्षात आले की लष्करी छावणीतली माणसे पाणी वापरतात पण कर मात्र देत नाही. त्यांनी लष्करी छावणीच्या दप्तराला ''जर इंग्रजांनी एका महिन्याच्या आत कर भरला नाही तर पाण्याचा पुरवठा थांबविण्यात येईल'', या आशयाची नोटीस बजावली.

या नोटीशीमुळे लष्करी छावणीत, शहरात आणि नगरपालिकेत एकच खळबळ उडाली. स्थानिक वर्तमान पत्रांनी टंडनजींनी बजावलेली नोटीस ठळकपणे प्रसिद्ध केली. पाणीपुरवठा थांबविण्याच्या मुदतीच्या शेवटच्या दिवशी अनेक लष्करी अधिकारी नगरपालिकेच्या दप्तरात हजर झाले. त्यांच्यातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने टंडनजींना सांगितले, ''तुम्हाला छावणीचा पाणी पुरवठा बंद करता येणार नाहीं.'' टंडनजी शांतपणे म्हणाले, ''आज कर भरण्यात आला नाही तर पाणी पुरवठा होणार नाही.''



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

लष्करी अधिकारी संतप्त सुरात ओरडू लागला. पण टंडनजी आपल्या म्हणण्यावर ठाम होते. शेवटी लष्करी अधिकारी निघून गेले. नगरपालिकेच्या दप्तरात कुतुहल निर्माण झाले. टंडनजींच्या वृत्तीतील धैर्य आणि दृढता पाहून प्रत्येकजण अचंबित होता.

दुसऱ्याच दिवशी लष्करी छावणीच्या इंग्रज अधिकाऱ्यांनी कर जमा केला.

**5.** खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा : 20

In ancient times in most civilized countries, for example in Egypt, Iraq, India, China and in the Roman Empire, many great irrigation works were constructed. In very hot countries, water is even carried in underground channels to prevent it from being evaporated by the sun's heat. In modern times, great dams have been built across rivers and these are used for more than one purpose, hence they are called multipurpose undertakings. Firstly, such dams help to prevent floods, by controlling the amount of water which rushes down a river in the rainy season. This also prevents an enormous amount of damage and loss to farmers. Secondly, by storing up great quantities of water in the artificial lakes behind the dams, irrigation can be provided for many acres of land in the dry season, so that crops can be grown where none would have grown before. Thirdly, the people in the towns and cities in the neighbourhood can be certain of getting a sufficient supply of water for drinking and other purposes, even in the driest weather. Fourthly, the water stored up behind the dams is made to generate electric power by letting it run through turbines.

**6.** *(a)* खालील वाक्प्रचारांचा/म्हणींचा अर्थ सांगून वाक्यात वापर करा : 2×5=10

*(i)* कागदी घोडे नाचविणे

*(ii)* चोरावर मोर बसणे

*(iii)* ताटाखालचे मांजर होणे

*(iv)* मनात मांडे खाणे

*(v)* सव्यापसव्य करणे

*(b)* खाली दिलेल्या कल्पनांचा *10* वाक्यात विस्तार करा : 5×2=10

*(i)* एकमेका साह्य करू अवघे धरु सुपंथ

*(ii)* वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे ....



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

*(c)* खालील विषयावर *20* वाक्यांचा संवाद लिहा : 10

‘मेक इन इंडिया’ मोहीम

*(d)* खाली दिलेल्या शब्दांचे समानार्थी शब्द लिहा : 1×5=5

*(i)* अनल

*(ii)* कमळ

*(iii)* भुंगा

*(iv)* यामिनी

*(v)* कनक

*(e)* खाली दिलेल्या शब्दसमुहांसाठी एक शब्द लिहा : 1×5=5

*(i)* लहानग्याला झोपवण्यासाठीचे गाणे

*(ii)* चार रस्ते एकत्र येतात ती जागा

*(iii)* तिथी, वार, नक्षत्र यांची माहिती देणारे पुस्तक

www.mpscmaterial.com

*(iv)* दुपारच्या जेवणानंतरची अल्प झोप

*(v)* नाटकाच्या प्रारंभीचे स्तवनगीत

★★★



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial